# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ / आषाढ ७, १९४६ ( शके )

(१) सहकार मंत्री
(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री
(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री
(४) आदिवासी विकास मंत्री
(५) कृषी मंत्री
(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री
(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

---

प्रश्नांची एकूण संख्या - २६

---

### राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

(१) * ७९४५१ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.दिपक

**चव्हाण (फलटण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे जिवित व वित्तहानीसह शेतकऱ्यांची घरे, शेतमाल, जनावरे, फळबागा व भाजीपाला इत्यादींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे अद्याप पंचनामे न होणे, काही ठिकाणी चुकीचे पंचनामे होणे इत्यादी कारणांमुळे अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच काही जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी वीज पडून अनेक व्यक्ती व जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे शेतात वाळवणासाठी ठेवलेल्या पिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निधी मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. तथापि, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ च्या मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (NDVI) हा निकष वापरुन शेतीपिकांचे नुकसान निश्चित करावयाचे असल्याने त्याबाबतची तपासणी वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ परभणी यांच्याकडून आज प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सर्व विभागीय आयुक्त यांचेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यावर निधी वितरणाची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा व अमरावती जिल्ह्यात अवैध रेती तसेच गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(२) * ८०४६८ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यात अवैधरित्या रेतीचे उत्खनन करुन वाहतूक केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध रेती वाहतूकीमुळे अजिसपूर येथील श्री.शेख शिराज या ३० वर्षीय तरुणाचा दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उक्त जिल्ह्यातील डोणगांव येथील शेत सर्व्हे क्र.२२४ मध्ये अवैधरित्या परवानगी पेक्षा जास्त गौण खनिजाची वाहतूक करुन शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) त्याचप्रमाणे तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील अनेक रेती घाटातून कोट्यवधी रुपयांचा अवैध रेती उपसा व वाहतूक होत असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त तालुक्यांतील अवैध रेती व गौण खनिजाचे उत्खनन आणि वाहतूक रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) लोणार तालुक्यामध्ये अवैध रेतीचे उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

लोणार तालुक्यामध्ये अवैध रेती वाहतूकीमुळे मौजे अजिसपुर येथील ३० वर्षीय तरूणाचा दिनांक १४.०३.२०२४ रोजी टिप्पर वाहन क्रमांक MH-२८ BB-६९६३ या वाहनाच्या धडकेमध्ये मृत्यू झाल्याने संबंधित वाहन चालकाच्या विरूध्द लोणार पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.००९६/२०२४ भादवी कलम ३०४A, २७९,१३४ व १८४ अन्वये दिनांक १४.०३.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात येवून सदर वाहन पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आले आहे.

लोणार तालुक्यात दिनांक ०१.०४.२०२३ पासून आज रोजीपर्यंत रेती या गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या एकूण २४ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येवून रू.२९,२०,६००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, सदर कालावधीत एकूण ४५५ ब्रास रेती जप्त करून पंचायत समिती, लोणार अंतर्गत शासकीय घरकुल योजनेसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच मौजे डोणगांव, ता.मेहकर, बुलढाणा येथील ग.नं.२२४ मध्ये परवानगी पेक्षा जास्त ब्रास गौण खनिज वापर केल्यामुळे संबंधिताविरूध्द रू.०६,८६,९४४/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) व (५) स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांना तिवसा हद्दीतील परतोडी गावासमोरील वर्धा नदीचे पात्रात अवैध उत्खनन करून वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली असता, सदर ठिकाणी अवैध उत्खनन व वाहतूक करत असलेल्या ठिकाणी कारवाई करण्यात येवून संबंधिताविरूध्द तिवसा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०२२/२०२४ भा.द.वि. कलम ३७९,१८८,१०९,३४ सह पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ कलम ९,१५,४८ अन्वये गुन्हा दाखल केला व सदर ठिकाणी सहा ते आठ ब्रास रेती घाळून ठेवलेली असल्याबाबतचा अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती यांना दिनांक १०.०५.२०२४ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती यांनी दिनांक ३०.०५.२०२४ च्या पत्रामध्ये सदर ठिकाणी महसूल विभागातील सक्षम अधिकारी, क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी, सक्षम तांत्रिक अधिकारी व उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांची समिती स्थापन करून त्या ठिकाणाची ETS मोजणी करून अहवाल सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, तिवसा – भातुकली, जि.अमरावती यांना कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित (महानंद) या दुग्ध संस्थेचे पुनरुज्जीवन तसेच बळकटीकरण करण्याबाबत**

**(३) * ७९४३४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित (महानंद) च्या व्यवस्थापकीय संचालकांच्या ढिसाळ कारभारामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी आघाडीची असलेली ही शिखर संस्था डबघाईस गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुग्ध संस्थेच्या पुनरुज्जीवन तसेच बळकटीकरणासाठी सदर संस्थेचे व्यवस्थापन गुजरात स्थित राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाकडे (एनडीडीबी) सोपविण्याचा ठराव दिनांक ३ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास महानंदच्या संचालक मंडळाने घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यास दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात महानंद व राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ यांच्यामध्ये झालेला करार, अटी व शर्ती आणि कामगारांची देणी इत्यादींबाबत अद्यापही स्पष्टता नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संस्थेमध्ये ८५० कर्मचारी असून त्यापैकी ५३० कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज सादर केले असून त्यांची १३० कोटींची देणी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, महानंद व राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती जनतेसाठी खुली करण्याची मागणी राज्यातील किसान सभा व अन्य संस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, (महानंद) मुंबई या दुग्धक्षेत्रातील सहकारी शिखर संस्थेची खालावलेली आर्थिक स्थिती विचारात घेऊन, सदर संस्थेचे पुनरुज्जीवन राष्ट्रीय दुग्धविकास मंडळामार्फत (NDDB) करण्याचा ठराव दिनांक १६.०१.२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पारीत करण्यात आला यानुषंगाने महानंदचे पुनरुज्जीवन राष्ट्रीय पातळीवरील दूध क्षेत्रातील प्रख्यात संस्था राष्ट्रीय दुग्धविकास मंडळामार्फत (NDDB) करण्याचा निर्णय दिनांक १३.०३.२०२४ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सदर निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १५.०३.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, महानंदचे व्यवस्थापन व प्रचालन राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ (NDDB) मार्फत करण्यास तसेच सन २०२४-२५ ते २०२८-२९ या ५ वर्षांसाठी महानंदवर प्रशासक म्हणून राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ (NDDB) नेमणूक करण्यात आली आहे. महानंदच्या पुनरुज्जीवन योजनेंतर्गत शासन व राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ (NDDB) यांचेमध्ये दिनांक १५.०४.२०२४ रोजी द्विपक्षीय करारनामा करण्यात आला आहे. या करारनाम्यानुसार राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाने (NDDB) सन २०२४-२५ ते २०२८-२९ या ५ वर्षांसाठी प्रशासक

म्हणून कामकाज पाहावयाचे असून, महानंदला उर्जितावस्था प्राप्त करुन द्यावयाची आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, (महानंद) मुंबई चे पुनरुज्जीवन करण्याकरीता व राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाने (NDDB) शासनाकडे रु.२५३.५७ कोटी इतक्या रकमेची मागणी केली असून शासनाने सदर रक्कम भागभांडवल स्वरुपात उपलब्ध करुन देण्यास शासन निर्णय दिनांक १५.०३.२०२४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(५), (६) व (७) महानंदच्या ५३० अधिकारी/कामगार/कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज सादर केले आहेत. सदर स्वेच्छानिवृत्तीपोटी रु.१३८.८४ कोटी इतका निधी लागणार असल्याने त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पिळकोस (ता.कळवण, जि.नाशिक) परिसरात मिरची पिकावर मर व घुबड्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(४) * ८०८४३ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिळकोस (ता.कळवण, जि.नाशिक) परिसरात मिरची पिकावर मर व घुबड्या रोगाचा प्रादुर्भाव झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मिरची पिकावर रोगाचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता व उक्त रोगांचा प्रादुर्भाव वाढू नये याकरिता कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदिपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रोगाचा प्रादुर्भाव वाढू नये याकरिता शेतकऱ्यांना मिरची पिकाची लागवड चंदेरी मल्चींग फिल्मचे आच्छादन करणे, तसेच रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे लावणे. ठिबक पध्दतीने पाणी देणे. ट्रायकोडर्माचा वापर करणे इ. बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच मिरचीवरील चुरडा-मुरडा तसेच घुबड्या रोगांच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्काची आठ ते दहा दिवसाच्या अंतराने आलटुन पालटून फवारणी करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील आदिवासी वसतीगृहाच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(५) * ८१४५० श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील आदिवासी वसतीगृहाची इमारत जीर्ण होऊन त्यास तडे गेलेले असणे, पाण्याचे पाईप तुटून पाणी गळती होणे, घाणीचे साम्राज्य पसरणे, डासांचा उपद्रव, तुटलेले पंखे, पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टरची व्यवस्था

नसणे, मुलींच्या आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था नसणे, वसतीगृहाला संरक्षक भिंत नसणे इत्यादी बाबींमुळे विद्यार्थीनींची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच संरक्षक भिंतीअभावी वसतीगृहातील मुलींची सुरक्षितता धोक्यात आली असून यासंदर्भात त्यांनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदर वसतीगृहात आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) आदिवासी मुलींचे वसतीगृह पेठ रोड, नाशिक (५०० क्षमता) या वसतीगृहातील मुलींचे वास्तव्य पेठ रोड येथील जुन्या वसतीगृह इमारतीत डिसेंबर, २०२३ पर्यंत होते. आता सद्य:स्थितीत पेठ रोड, नाशिक येथे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृहाची इमारत (तळमजला + ७ मजले) बांधकाम केलेले आहे. सदरचे बांधकाम हे बांधकाम व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात आलेले आहे. त्यामध्ये सर्व सोई-सुविधांयुक्त जसे, पिण्याच्या पाण्याचे फिल्टर, अंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था, २ उदवाहक, अग्नि प्रतिरोधक योजना, फर्निचर इ. परिपुर्ण सोई-सुविधा उपलब्ध आहेत. सदरची बांधकाम पुर्ण झालेली इमारत माहे जानेवारी २०२४ मध्ये आदिवासी विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सद्य:स्थितीत वसतीगृह इमारतीचा वापर सुरु असुन विद्यार्थीनींची गैरसोय झालेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्याच्या सागरी हद्दीत बेकायदेशीररित्या आलेल्या कर्नाटकमधील मच्छिमार ट्रॉलर्सनी गस्ती नौकेवर केलेल्या हल्ल्याबाबत

**(६) * ७९७७८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्याच्या सागरी हद्दीत बेकायदेशीररित्या आलेल्या कर्नाटकमधील मच्छिमार ट्रॉलर्सनी मत्स्य विभागाच्या गस्ती नौकेवरील कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला केल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे अन्य राज्यांतील मच्छिमार ट्रॉलर्सकडून सागरी हद्दीत घुसखोरी करून महाराष्ट्रातील मच्छिमारी नौका, खलाशी व तांडेल यांच्यावर हल्ले करण्याचे प्रकार वारंवार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील ३-४ वर्षापासून अशाप्रकारे अनधिकृतरित्या मच्छिमारी होत असताना शासनाने यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्याच्या सागरी हद्दीत बेकायदेशीररित्या घुसलेल्या कर्नाटकामधील मच्छिमार ट्रॉलर्सनी मत्स्य विभागाच्या गस्ती नौकेवरील कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२३ दरम्यान घडली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात दिनांक २३.११.२०२३ रोजी तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यात दिनांक १४.०३.२०२१ रोजी अन्य राज्यातील ट्रॉलर्सकडून मत्स्य विभागाच्या गस्ती नौकेवर हल्ला झाल्याची घटना घडली आहे.

(३) सिंधुदूर्ग जिल्ह्यात दिनांक १४.०३.२०२१ रोजी अन्य राज्यातील ट्रॉलर्सकडून विभागाच्या गस्ती नौकेवर हल्ला झाल्याची घटनेबाबत वेंगुर्ला पोलिस ठाणे येथे एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत अनधिकृत मासेमारी नौकांवर कारवाई केली जाते.

(४) दिनांक १४.०३.२०२१ रोजीच्या घटनेबाबत वेंगुर्ला पोलीस स्टेशनकडून तपास सुरु आहे. तसेच महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत अनधिकृत मासेमारी नौकांवर कारवाई केली जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील मावळ व मुळशी तालुक्यात गौण खनिजाचे बेकायदेशीर उत्खनन होत असल्याबाबत

**(७) * ८०१७४ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ व मुळशी (जि.पुणे) तालुका आणि परिसर हा इको सेन्सिटिव्ह असल्याने त्या भागात उत्खननाचे परवाने शासनाकडून दिले जात नसतानाही तालुक्यातील पवनमावळ, अंदरमावळ व नाणेमावळ येथे वृक्षतोड व बेकायदेशीररित्या लाल माती व मुरुम या गौण खनिजाचे उत्खनन, चोरी, वाहतूक व विक्री होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील चऱ्होली, चोवीसवाडी, वडमुखवाडी भागातील गृह प्रकल्प बांधकाम व्यावसायिकांकडून देखील वृक्षतोड, गौणखनिजाचे बेकायदेशीररित्या उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत उत्खनन महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन अवैध गौण खनिजाचे उत्खनन रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषी आणि यास जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात बेकायदेशीर वृक्षतोड व लाल माती, मुरुम उत्खननाबाबतची बातमी माहे एप्रिल, २०२४ मध्ये वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याची निदर्शनास आले आहे. मावळ तालुक्यात अनधिकृत गौणखनिज उत्खनन रोखण्यासाठी तालुका स्तरावर नायब तहसिलदार व महसूल मंडळ स्तरावर मंडळ अधिकारी, तलाठी यांची भरारी पथके नेमण्यात आलेली आहेत.

मावळ तालुक्यात माहे एप्रिल, २०२४ पासून गौणखनिज उत्खननाच्या एकूण २२ प्रकरणामध्ये परवानगी दिली असून त्यामध्ये २५.८५ लाख एवढी रक्कम शासन जमा केली आहे. तसेच माहे एप्रिल, २०२४ पासून अनधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतूक १८ प्रकरणांमध्ये २८.३३ लाख दंडाची रक्कम शासन जमा करणेत आलेली आहे व ५ प्रकरणामध्ये कसुरदारांच्या जमिनीचे ७/१२ वर अनधिकृत गौण खनिज उत्खनन बोजाची नोंद घेण्यात आलेली आहे.

तसेच वृक्षतोड व वनक्षेत्रातील उत्खननाबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी वडगांव मावळ व वनपरिक्षेत्र अधिकारी शिरोता (प्रा) यांचे अहवालानुसार माहे एप्रिल, २०२४ मध्ये मावळ तालुक्यात बेकायदेशीर वृक्षतोड व उत्खनन झाले नसल्याचे दिसून येते.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांना शासकीय अनुदान मिळण्यासाठी असलेल्या जाचक अटींबाबत

**(८) * ८०९२१ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दूधाचे दर वाढविण्याबाबत झालेल्या आंदोलनामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने दिनांक १० जानेवारी ते ११ फेब्रुवारी, २०२४ या एका महिन्यासाठी राज्य सहकारी दूध संघ आणि खाजगी दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रती लिटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेकडो दूध उत्पादक शेतकरी या अनुदानापासून अद्यापही वंचित असून अनुदानासाठीची नोंदणी, Ear tagging, SNF सारख्या जाचक अटींमुळे देखील अनेक सहकारी दूध प्रकल्प व शेकडो शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान तात्काळ वितरीत करणेबाबत तसेच जाचक अटी दूर करुन योजनेचे सुलभीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

सदरची योजना प्रथम एक महिन्याच्या कालावधीकरीता निश्चित करणेत आली होती. तद्नंतर शासन निर्णय दिनांक २६.०२.२०२४ नुसार दिनांक ११.०२.२०२४ ते दिनांक १०.०३.२०२४ पर्यंत सदर योजनेस एक महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) व (३) संगणक प्रणालीवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुदानाचा लाभ देण्यात आलेला आहे. यामध्ये जनावरांची नोंदणी करणे व FSSAI यांनी दिलेल्या मानकाप्रमाणे ३.२/८.३ गुणप्रत या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. तथापि, जाचक अटींमुळे शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले ह्या बाबीत तथ्य नाही.

राज्यातील सहकारी व खाजगी प्रकल्प तसेच दूध उत्पादक शेतकरी यांचेशी चर्चा करुन आवश्यक बाबींमध्ये उपाययोजना करुन योजनेचे सुलभीकरण करुन अनुदान वितरीत करणेत आलेले आहे.

सदर अनुदान योजनेत एकूण २३८ प्रकल्पांनी शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्यांचे दूध उत्पादक शेतकऱ्यांची माहितीच्या फाईल्स या अनुदान योजनेच्या सॉफ्टवेअरमधून सादर केलेल्या आहेत. याअन्वये २९५७२८ दूध उत्पादक शेतकऱ्यांना रु.२२८,३३,७०,१४०/- अनुदानाचा आर्थिक लाभ थेट DBT द्वारे त्यांच्या वैयक्तिक बँक खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात बोगस दस्तऐवज नोंदणीच्या तक्रारी प्राप्त होत असल्याबाबत**

**(९) * ८०२७८ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी बोगस दस्तऐवजाच्या आधारे दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात नोंदण्या करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औंध (ता.हवेली, जि.पुणे) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात (१९) बनावट अकृषिक (एन.ए.) परवानगी जोडून दस्त नोंदणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तपासणीअंती राज्यात सुमारे १० हजार बोगस खरेदीखतांची नोंदणी प्रकरणी ४४ दुय्यम निबंधक आणि लिपिक दोषी आढळले असता त्यांचेवर निलंबन, बदली अशाप्रकारची कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असे असतानाही काही दिवसातच निलंबित कर्मचारी व अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेवून त्यांना पुणे येथे नियुक्ती देण्यात आली असून तेथे पुन्हा बोगस दस्तऐवजांच्या आधारावर नोंदणी सुरु झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन राज्यातील बोगस नोंदणी प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. तथापि, काही दिवसांत अनेक अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले, हे अंशत: खरे आहे.

नोंदणी केलेल्या ज्या दस्तऐवजासोबत एन.ए.ऑर्डर व भोगवटापत्र जोडलेले आहेत. त्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्याकरिता पुणे महानगरपालिका, पुणे महानगर विकास प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचेकडे पाठविण्यात आले आहेत. त्यांचेकडून पडताळणी अहवाल प्राप्त होताच योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(५) दस्तऐवजातील संबंधित पक्षकार यांचेवर नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सह दुय्यम निबंधक हवेली क्र. ३, हवेली क्र. ११, हवेली क्र. १३, हवेली क्र.१९, हवेली क्र.२१ व हवेली क्र.२४ या कार्यालयात नोंदणी झालेले ३८ दस्तांमध्ये २० गुन्हे विविध पोलिस स्टेशन मध्ये दाखल झालेले असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक पर्यंतचे शिक्षण अनुदानित आश्रमशाळांमध्येच मिळण्याबाबत

**(१०) * ७९७०६ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे याकरिता आदिवासी विकास विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळातील शिक्षण हे माध्यमिक शिक्षणापर्यंतच उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उक्त विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी वा घरापासून दूर असलेल्या शाळांमध्ये जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शिक्षण घेण्यासाठी घरापासून शाळेपर्यंतचे अंतर जास्त असल्याने आदिवासी मुले-मुली शाळाबाह्य होतात किंवा शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहत असून त्यामध्ये मुलींचे प्रमाण सर्वात जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षण अनुदानित आश्रमशाळेतच उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात स्वयंसेवी संस्थाव्दारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांना संलग्न १५१ उच्च माध्यमिक आश्रमशाळा सुरु आहेत. सदर आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध होते.

(२) व (३) अंशत: खरे आहे

ज्या अनुदानित आश्रमशाळेमध्ये उच्च माध्यमिकचे वर्ग नाहीत, अशा अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी पुढील शिक्षण घेण्यासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या जवळच्या शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश घेतात. सद्य:स्थितीत राज्यात एकूण ४९० शासकीय वसतीगृहे व ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यान्वित आहेत.

शासकीय/अनुदानित आश्रमशाळा तसेच मुला-मुलींचे वसतीगृह हे निवासी असल्यामुळे विद्यार्थ्यांचे घर निवास व शाळेचे अंतर या बाबींचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत नाही. त्यामुळे घरापासून अंतर दूर असल्याने मुले-मुली शाळाबाह्य होणे तसेच शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असणे ही वस्तुस्थिती नाही.

(४) आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात स्वयंसेवी संस्थाव्दारे चालविण्यात जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांच्या संदर्भात आतापर्यंत आदिवासी विद्यार्थ्यांना माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शैक्षणिक गरजेनुसार वेळोवेळी प्राथमिक अनुदानित आश्रमशाळांना माध्यमिक आश्रमशाळा सुरु करण्यास तसेच माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ करुन सदर अनुदानित माध्यमिक आश्रमशाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालये (इयत्ता ११ वी व १२ वी, कला व विज्ञान) सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(११) * ८००१०  श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अनिल देशमुख (काटोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हवामानातील बदल तसेच दुष्काळ व अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नुकसान झाल्यास त्यांना नुकसान भरपाई मिळणेकरिता पिक विमा योजना सुरु करण्यात आली असून त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारने खरीप पिक विमा योजनेचे निकष बदलून आता कोणत्याही टप्प्यावर पिकांचे नुकसान झाल्यास १०० टक्के नुकसान भरपाई देण्याचे आदेश विमा कंपन्यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असे असताना राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पीक विम्याची रक्कम अद्याप मिळालेली नसून अनेक तांत्रिक त्रुट्यांमुळे विमा कंपन्या शेतकऱ्यांचे दावे नाकारत असून अनेक दावे प्रलंबित ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिक विमा कंपन्या एकीकडे हजारो कोटी रुपयांचा नफा कमवित असून शेतकऱ्यांना मात्र विम्याची भरपाई देत नसल्यामुळे अनेक शेतकरी मा.उच्च न्यायालयात गेले असता न्यायालयाने ७ कंपन्यांना नोटीस बजाविल्यानंतर त्याचे उत्तर सदर कंपन्यांनी दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा संपूर्ण लाभ मिळणे, विमा कंपन्यांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण आणण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ०८.०३.२०२४ व ३०.०४.२०२४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पिक वाढीच्या कोणत्याही अवस्थेत नुकसान झाले तरी १००% उत्पादन खर्च गृहीत धरणेच्या सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२३ अंतर्गत दिनांक २७.०५.२०२४ च्या अंतरिम आकडेवारीनुसार पिक विमा नुकसान भरपाईसाठी राज्यात एकूण रु.४१७५ कोटी रक्कम मंजूर झाली असून त्यापैकी रु.३५६१.९२ कोटी नुकसान भरपाई

वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही चालू आहे.
(४) हे खरे नाही.

खरीप २०२३ मध्ये राज्यात ९ विमा कंपन्यांच्या मार्फत पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. राज्यात Cup and Cap Model (८०:११०) नुसार योजना राबविण्यात येत असून त्यानुसार विमा कंपन्यांचा नफा एकूण विमा हत्याच्या २०% पर्यंत मर्यादीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे विमा कंपन्यांच्या अतिरिक्त नफ्यावर नियंत्रण आले आहे.
(५) राज्यात प्रधानमंत्री पिक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) अर्बन को ऑप. बँकेतील सामान्य ठेवीदार व खातेदारांच्या ठेवी परत देण्याबाबत

**(१२) * ७९५७९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) अर्बन को.ऑप. बँकेत झालेल्या घोटाळयामुळे लाखो ठेवीदारांच्या ठेवी अडकून पडलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संचालकांविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई केल्यानंतर रिझर्व्ह बँकेकडून पेण अर्बन बँकेचा परवाना रद्द करण्यात येणे, परंतु, सदरहू बँक अवसायनात काढण्याचा निर्णय तत्कालीन सहकार मंत्री यांनी रद्द केल्यामुळे सुमारे १ लाख ९२ हजार ठेवीदारांचे पैसे अद्यापपर्यंत मिळू शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१५ मध्ये बँकेतील ठेवीदार व खातेदारांच्या सुमारे ७५८ कोटी रुपयांच्या ठेवी परत मिळण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाने रायगड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय ‘विशेष कृती समिती’ स्थापन केली, हे ही खरे आहे काय,
(४) तरीही अद्यापही ठेवीदारांच्या ठेवी त्यांना परत मिळू शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन ठेवीदारांचा निधी तात्काळ परत मिळण्याबाबत तसेच संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) पेण अर्बन बँकेच्या अवसायनाच्या तारखेस बँकेत एकूण १,९७,२२३ ठेवीदारांच्या रु. ७३८.३९ कोटी इतक्या ठेवी होत्या. त्यापैकी अद्यापपर्यंत ३८,५७४ ठेवीदारांच्या रु.५८.८४ कोटी इतका रक्कमेच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत. सध्यस्थितीत १,५८,६६९ ठेवीदारांच्या रु. ६११.१७ कोटी एवढ्या रक्कमेच्या ठेवी परत करणे बाकी आहे.

पेण अर्बन को-ऑप. बँकेचे सन २००८ ते २०१० या कालावधीकरीता करण्यात आलेल्या लेखापरिक्षण अहवालानुसार बँकेत रु. ५९८ कोटी इतक्या रक्कमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने पेण पोलीस ठाणे येथे बँकेचे संचालक/ कर्मचारी/बँकेचे लेखापरीक्षक अशा एकूण ४१ व्यक्तींविरुध्द गुन्हा क्र.३४/२०११ दाखल करण्यात आला आहे. तसेच बँकेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता दोषी

संचालकांविरुध्द अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये सेवानिवृत्त न्यायाधिश यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी बँकेचे तत्कालीन संचालक मंडळ व संबंधित अधिकारी/कर्मचारी असे एकूण २५ जणांवर आर्थिक जबाबदारी निश्चित केली असून त्याप्रमाणे रु. ५९७.२१ कोटीचे आर्थिक वसुली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे.

बँकेचे अध्यक्ष/संचालक यांनी ठेवीदारांच्या ठेवीतून खरेदी केलेल्या १४३ मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण (एम.पी.आय.डी.) अधिनियम, १९९९ मधील तरतुदीनुसार जप्त केल्या असून उपविभागीय अधिकारी, पेण यांच्या ताब्यात आहेत.

पोलिस यंत्रणेकडून १२८ बोगस कर्जखात्यांची चौकशी करून आरोपी/साक्षीदार यांचेकडून रु.५.१२ कोटी रक्कम हस्तगत करण्यात आली असून सुमारे १३१.६ एकर जमीन जप्त करण्यात आली आहेत. संचालकांची एकूण ६ एकर जमीन, ५ व्यापारी गाळे, ४ घरे या मालमत्तांची जप्ती प्रक्रीया पोलिस यंत्रणेमार्फत सुरू आहे.

सी.बी.आय. कडून गैरव्यवहारासंदर्भात रु.२८.१२ कोटी जमा करण्यात आले आहे. या प्रकरणी दाखल गुन्हयामध्ये अद्यापपर्यंत ५२ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत संबंधितांची जामीनावर मुक्तता करण्यात आली आहे.

दि पेण को ऑप अर्बन बँक लि. पेण या बँकेच्या वसुलीचे संनियंत्रण करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार दिनांक १६.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या विशेष कृती समितीकडून दरमहा बँकेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वाघांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(१३) * ८०६४७ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाघांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत असून गेल्या ७ वर्षात शेतपिकाच्या सुरक्षिततेसाठी लावलेल्या विजेच्या तारांमध्ये अडकून १६२ वाघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे तसेच विदर्भात माहे मार्च-एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान तीन वाघांचा संशयास्पदरित्या मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरापासून काही अंतरावरील रुई गावात तर भंडारा वन विभागांतर्गत लेंडेझरी तसेच गोंदिया वन विभागांतर्गत देवरी वनक्षेत्रात मृतावस्थेत आढळलेल्या वाघांच्या पायांची नखे व पंजे गायब झाले असल्याचेही दिनांक २१ व ३० मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०२३ मध्ये जवळपास ५२ वाघांचा मृत्यू झाला असतानाच सन २०२४ या कालावधीतही पहिल्या तीन महिन्यांत आतापर्यंत १० वाघांचा मृत्यु झाला असून नागपूर, भंडारा व गोंदिया वनविभागातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वाघाच्या शिकारीतही वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविलेल्या मृत वाघांच्या अवशेषांच्या तपासणीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाघांचे मृत्यू व शिकारीच्या घटना रोखणेबाबत तसेच यातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यात सन २०१८ ते माहे मे, २०२४ या कालावधीत विद्युत प्रवाहामुळे २२ वाघांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

विदर्भात माहे जानेवारी, २०२४ ते माहे मे, २०२४ या कालावधीत झालेल्या ५ वाघांच्या मृत्युच्या घटनांचा तपास सुरु आहे.
(२) तसेच सन २०२४ मध्ये नागपूर वनविभागातील सेमीनरी हिल्स, नागपूर वनपरिक्षेत्रतील आयसीडी अजनी अंतर्गत मौजा रुई या गावामध्ये ईडन पार्कजवळ दिनांक २०.०३.२०२४ रोजी वाघाचे शव कुजलेल्या अवस्थेत आढळून आले आहे. सदर वाघाच्या डोक्याचे हाड मोडल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. या आधारावर प्राथमिक चौकशीत सदर वाघाच्या मृत्युचे संभावित कारण अपघात नोंदविण्यात आले आहे. सदर वाघाच्या मागील डाव्या पायाची २ नखे आढळून आली नाही. सदर नखे अपघाताने तुटली असावीत असे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे. सदर वाघाचे अवयवाचे नमूने न्यायवैद्यक प्रयोग शाळेत पाठविण्यात आले असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

भंडारा वनविभागातील लेंडेझरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र लेंडेझरी-२ येथे दिनांक २७.०३.२०२४ रोजी एक नर वाघ मृत अवस्थेत आढळून आला असून त्याचे सर्व अवयव शाबुत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर वाघाचा मृत्यू हा दोन वाघांच्या आपसी झुंजीत झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

गोंदिया वनविभागातील देवरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र रोपा यथील कक्ष क्रमांक ९८ (राखीव वन) येथे दिनांक २०.०३.२०२४ रोजी वनकर्मचाऱ्यांना गस्ती दरम्यान वाघाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. प्रस्तुत प्रकरणाची माहिती मिळताच वन अधिकारी / कर्मचारी, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांचे प्रतिनिधी, मानद वन्यजीव रक्षक गोंदिया, सहाय्यक आयुक्त पशु संवर्धन देवरी, पशु अधिकारी देवरी व इतर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता नाल्याच्या काठावर खड्‌यासारख्या ठिकाणी मृत वाघाचे केस व विखुरलेल्या अवस्थेत शरीर / अवयव आढळून आहे. राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाने जारी केलेल्या SOP अवलंब करुन वाघाच्या अवयवाचे नमूने गोळा करुन न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर येथे पाठविण्यात आले असून उर्वरित अवयव जाळून नष्ट करण्यात आले आहेत.
(३) सन २०२३ मध्ये राज्यात नैसर्गिकरित्या-२६, अपघाताने-१०, विषबाधेमुळे-२, विद्युत प्रवाहामुळे-९ व शिकारीमुळे-४ अशा एकूण ५१ वाघांचा मृत्यु झालेला आहे.

माहे जानेवारी, २०२४ ते दिनांक २०.०५.२०२४ या कालावधीत नैसर्गिकरित्या-८, अपघाताने-२, विद्युत प्रवाहामुळे-१ व तपास सुरु असलेले-५ अशा एकूण १६ वाघांचा मृत्यू झालेला आहे.
(४) चंद्रपूर वनवृत्तातील सन २०२३ पासून न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत मृत वाघांच्या अवशेषाचे एकूण २८ नमुने पाठविण्यात आले होते. त्यापैकी ११ नमुन्याचे तपासणी अहवाल प्राप्त झाले आहेत.

यवतमाळ वनवृत्तातील सन २०२३ पासून न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेल्या ४ मृत वाघांच्या अवशेषाच्या नमुन्याचे तपासणी अहवाल प्राप्त झाले आहेत.

ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा, मेळघाट व्याघ्र प्रकल्प तसेच गडचिरोली व नागपूर वनवृत्तातील मृत वाघांच्या अवशेषाचे न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेल्या नमुन्याचे अहवाल अद्याप अप्राप्त आहेत.
(५) वाघांच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.

• विद्युत प्रवाहामुळे वाघांचे व अन्य वन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये म्हणून वनविभाग व म.रा.वि.वि. महामंडळ मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे सनियंत्रण करण्यात येते.

• अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.

• विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद गतीविधींवर लक्ष ठेवण्यात येते.

• अतिसंवेदशील क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

• जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे तयार करण्यात आले आहेत.

• राज्यातील वन्यप्राण्यांबाबत गुन्हे प्रकरणांची अद्यावत माहिती ठेवणेकरीता वन्यजीव गुन्हे कक्ष Wildlife Crime Cell प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर येथे तयार करण्यात आला आहे व सदर कक्षाचे बळकटीकरण करण्यात येत आहे. तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.

• अतिसंवेदशील क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके तयार करण्यात आले असून त्याद्वारे, येणा-या जाणा-या वाहनांची नियमित तपासणी करण्यात येते.

• परिक्षेत्र स्तरावर वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचे मागोव्याचा पंधरवडी कार्यक्रम राबवून त्यांच्या अस्तित्वाबाबतची माहिती घेण्यात येते. गावालगत असलेल्या मुसाफिर लोकांचे डेरे तपासणी करण्यात येते व त्यांचे हालाचालींवर लक्ष ठेवण्यात येते.

• वाघाचे भ्रमणमार्ग, पाणवठे व महत्वाचे ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून संशयास्पद हालचालीवर पाळत ठेवण्यात येते. तसेच पाण्यामध्ये विष प्रयोग होऊ नये याकरीता नियमीत पाणवठ्याची तपासणी केली जाते. या व्यतिरीक्त मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने पाणवठ्याकडे जाणाऱ्या मार्गावर शिकारी लोकांव्दारे लोखंडी ट्रॅप लावले नसल्याची खातरजमा करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी शाळांना पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहारात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(१४) * ८१७२७ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत अधिनस्त असलेल्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दिनांक १५ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार आहारात दररोज २५० मिली दूध देण्याचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या दूधाची किंमत प्रती लिटर ५५ रुपये असताना ते प्रती लिटर १४६ रुपये दराने खरेदी करुन ८० कोटी रुपयांचा तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या पुरवठा कंत्राटांमध्ये

रुपये २५० कोटीचा आर्थिक घोटाळा करण्यात आला असल्याचे दिनांक २२ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय विद्यार्थ्यांना दूध पुरवठा करण्याबाबत शासनाच्या सन २०१८-१९ मधील शासन निर्णयात शासनस्तरावरच गेल्या वर्षी सोईस्कररित्या बदल करुन आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तेच दूध रुपये १४६ प्रती दराने खरेदी केल्याचे तसेच कंत्राट क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ब्रिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यासह अन्य कंपन्यांना पोषण आहाराची नियमबाह्यरित्या कंत्राटे दिली असून या दोन्ही प्रकरणांमध्ये सुमारे ३३० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सविस्तर चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना पुरवठा करण्यात येणारे दुध हे सुगंधी दुध २०० मि. ली. असुन ते टेट्रापॅक मध्ये पुरवठा करण्यात येते. त्याकरीता प्रती २०० मि. ली. टेट्रापॅकेट दर रुपये २६.२५ इतका निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेला आहे. त्यानुसार टेट्रापॅक दुधाची प्रती लिटर किंमत रु. १३१.२५ इतकी आहे. त्यांमध्ये सर्व कर व अति दुर्गम भागातील आश्रमशाळा स्तरावर पोहोच (वाहतुकीसह) प्रती लिटर दर आहे.

(३) हे खरे नाही.

शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना पुरवठा करण्यात येणारे दुध हे सुगंधी दुध २०० मि. ली. असुन ते टेट्रापॅक मध्ये पुरवठा करण्यात येते व त्याकरीता प्रती २०० मि. ली. टेट्रापॅकेट दर रुपये २६.२५ इतका निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेला आहे. त्यानुसार टेट्रापॅक दुधाची प्रती लिटर किंमत रु. १३१.२५ इतकी आहे. त्यांमध्ये सर्व कर व अति दुर्गम भागातील आश्रमशाळा स्तरावर पोहोच (वाहतुकीसह) प्रती लिटर दर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) निरंक.

-----------------

## मारोडी व चोखाळा (ता.मौदा, जि.नागपूर) येथे रेतीची अवैध वाहतूक केल्याबाबत

**(१५) * ७९७७६ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारोडी (ता.मौदा, जि.नागपूर) येथील कन्हान व सांड नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैधरित्या उपसा व वाहतूक होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मारोडी येथे मौदा पोलिस ठाण्याच्या हद्दीत रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या भरधाव ट्रॅक्टरने रस्त्यालगत उभ्या असलेल्या दोघा व्यक्तींना धडक दिल्याने एकाचा मृत्यू व दुसरा गंभीर जखमी झाल्याचे देखील माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चोखाळा (ता.मौदा, जि.नागपूर) येथील शिवारात विना रॉयल्टी रेतीची वाहतूक करणारा ट्रॅक्टर दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास पकडण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ट्रॅक्टरमधील विना रॉयल्टी वाहतूक सुरू असलेला सुमारे ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल शासनाने जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) दिनांक २३.०४.२०२४ रोजी मौजा पोलीस ठाण्याचा हद्दीत भरधाव ट्रॅक्टरने रस्त्यालगत उभ्या असलेल्या दोघा व्यक्तींना धडक दिल्याने एकाचा मृत्यू व दुसरा गंभीर जखमी झाल्याच्या अनुषंगाने संबंधिता विरूध्द गु.र.क्र. ०४५९/२०२४ भादवि क्रलम-२७९/३३८/३०४A व मा.वा.अ. कलम १८४,१३४ व १७७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तथापि सदर प्रथम खबरी अहवालानुसार ट्रॅक्टरमध्ये अवैध वाळूचे उत्खनन करून वाहतूक करीत असल्याबाबत नोंद नाही.
(३), (४) व (५) मौजे अरोली येथील पोलिसांना दिनांक २०.०४.२०२४ रोजी किरणापुर ते चोखाळा रोडवर ट्रॅक्टर क्रमांक MH-४०, CA-२४९७ अवैध रेतीची वाहतूक करताना आढळून आल्याचा व सदर ट्रॅक्टर ट्राली घटनास्थळी सोडून पळून गेल्याने संबंधिताविरूध्द गु.र.क्र.१३५/२०२४ भादवी कलम ३७९, म.ज.म.अ. कलम ४८(८), खान आणि खनिज अधिनियम कलम ४, २१ सह सा.मा.नु. प्र.अ. कलम ३ अन्वये दिनांक २२.०४.२०२४ रोजी गुन्हा दाखल केला आहे. संबंधीतावर दंडात्मक कारवाई करण्यात सहायक पोलीस निरिक्षक, अरोली पोलीस स्टेशन यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तहसिलदार, रामटेक यांनी संबंधितास १ ब्रास रेती या गौण खनिजाची अवैध वाहतूक केल्याप्रकरणी दिनांक २८.०५.२०२४ रोजी रू.१३,१००/- रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. तसेच सदर अवैध वाहतूक करण्यात आलेल्या वाहनावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत तहसीलदार, रामटेक यांनी उपविभागीय अधिकारी, रामटेक यांना अहवाल सादर केला आहे.
(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात वन कायद्यातील तरतुदी ग्रामीण भागातील मुख्य पारंपारिक रोजगार निर्मितीत अडसर ठरत असल्याबाबत

**(१६) * ८१४९२ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गडचिरोली व काही जिल्ह्यात वन विभागाचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असून वन कायद्यातील तरतुदी ग्रामीण भागातील मुख्य पारंपारिक रोजगार निर्मितीच्या कामात अडसर ठरत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात शेती हाच मुख्य व्यवसाय असून संपूर्ण अर्थव्यवस्था पूर्णत: शेतीवर अवलंबून असल्याने शेतीचा हंगाम संपल्यावर उन्हाळयाच्या दिवसात जंगलावर आधारित मोहफुले, तेंदूपत्ता गोळा करणे व बुरुड कामे आदि रोजगार राखीव वनामुळे नष्ट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात कसत असलेल्या अतिक्रमित शेतीचे स्थायी पट्टे स्थानिकांना न देता वन विभागाने ते भूईसपाट केल्यामुळे येथील शेतकरी व भूमीहीन मजूर बेरोजगार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शेतकरी आणि भूमीहीन मजुरांच्या मागणीनुसार पूर्वीपासून कसण्यात येणारे वनपट्टे व वनातील मोहफुले, तेंदूपत्ता व बुरुड कामे तसेच राखीव वन क्षेत्रातील जंगलावर आधारित रोजगार शेतकऱ्यांना

मिळण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिक आदिवासी-बांधव त्यांचे उदरनिर्वाह साठी वनातील वनोपजावर अवलंबून राहतात. त्यामुळे स्थानिक गावकरी माहे मार्च, एप्रिल महिन्यात जास्त प्रमाणात मोहफुले, हिरडा, बेहडा, चार, व औषधीयुक्त अन्य वनउपज गोळा करीत असतात. तसेच मोहफुले सुकवून त्यातील काही भाग स्थानिक लोक स्वतः खाण्यासाठी वापरतात तसेच काही भाग बाजारात व खाजगी व्यापाऱ्यांना विक्री करतात.

तसेच बुरुड कामे करणारे बुरुडांना त्यांचे मागणीनुसार बांबू पुरवठा करण्यात येत आहे. त्यातून त्यांना रोजगार मिळत आहे. त्यामुळे जंगलावर आधारित मोहफुले, तेंदूपत्ता गोळा करणे व बुरुड कामे आदि रोजगार राखीव वनामुळे नष्ट होत आहे असे निदर्शनास आलेले नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यात वनहक्क कायद्यातील नियमानुसार सन २००५ पूर्वी वनजमीनीवर अतिक्रमण केलेल्या अतिक्रमण धारकांस एकुण ४०८२०.६६७ हे. क्षेत्राचे स्थायी पट्टे वाटप करण्यात आले आहेत.

तसेच शेतकरी आणि भूमीहीन मजुरांच्या मागणीनुसार पूर्वीपासून कसण्यात येणारे वनपट्टे मिळण्याकरीता जिल्हाधिकारी यांचे समितीसमोर सुनावणी करण्यात येते. वनातील मोहफुले, तेंदूपत्ता व बुरुड कामे तसेच राखीव वन क्षेत्रातील जंगलावर आधारित रोजगार शेतकऱ्यांना मिळण्याकरिता वनविभागामार्फत एकुण २५ तेंदू घटक निर्माण केलेले असून त्याची विक्री झालेली आहे. त्यातुन रोजगार निर्मिती होत आहे. पेसा क्षेत्रातील ग्रामसभा स्वबळावर तेंदूपत्ता विक्री व्यवस्थापन करीत असल्याने त्यापासून सुध्दा रोजगार निर्माती होत आहे. बुरुड कारागिरांना त्यांच्या मागणीनुसार बांबूचा पुरवठा वनविभागाकडून करण्यात येत असल्याने त्यांना रोजगार मिळत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात विविध कारणांमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(१७) * ७९४३१ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक ठिकाणी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान, शेतमालाला हमीभाव व योग्य किंमत न मिळणे व कर्जबाजारीपणामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना जिल्हास्तरीय समितीकडून अद्यापही पात्रता निश्चित न झाल्यामुळे तसेच अनेक लोकांना अपात्र ठरविल्यामुळे ते नुकसान भरपाईच्या रकमेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीच्या रकमेत गत १८ वर्षापासून वाढ झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे, शेतीमालाला हमीभाव देणे व त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत तसेच मदतीच्या रकमेत वाढ करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय, अशंत: खरे आहे.
(२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/ सहकारी बँक किंवा मान्यता प्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास पात्र प्रकरणातील शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रू.१.०० लक्ष प्रमाणे शासन निर्णयातील तरतुदीनुसार मदत दिली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यात जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला प्रश्न सोडविण्याबाबत

**(१८) * ८०८८० श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळे गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात हिरव्या व सुकलेल्या चाऱ्याची मोठ्या प्रमाणात टंचाई असतानाच चाऱ्याचे दर देखील आवाक्याबाहेर गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान चारा टंचाईवर उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरिय कृतीदलाकडून ३ महिन्यात सादर करण्यात येणारा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी चारा डेपोंची संख्या कमी असून शासनाने तातडीने चारा डेपो सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन चारा व पाणी टंचाई दूर करणे, चाऱ्याचे दर स्थिर करणे तसेच चारा डेपो सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) नाही.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(४) व (५) शासन निर्णय दिनांक १३ जून, २०२४ अन्वये राज्यात खरीप हंगाम २०२३ च्या अनुषंगाने राज्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर केलेल्या १२४५ महसूल मंडळांमध्ये दिनांक ३१.८.२०२४ पर्यंत अथवा पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होईपर्यंत आवश्यक त्या ठिकाणी "चारा डेपो" उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच राज्यात सद्य:स्थितीत हिरवा व वाळलेला चारा अनुक्रमे ११७.३६ लक्ष मे.टन व ४८.५६ लक्ष मे.टन शिल्लक आहे. शिल्लक हिरवा चारा साधारणपणे जून, २०२४ पर्यंत व वाळलेला चारा जुलै, २०२४ पर्यंत पशुधनास पुरेल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हरिसाल (जि.अमरावती) येथील वनपरिक्षेत्र अधिकारी आत्महत्येप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबात**

**(१९) * ७९४१५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरिसाल (जि.अमरावती) येथे कार्यरत वनपरिक्षेत्र अधिकारी, कै.दिपाली चव्हाण यांनी दिनांक २५ मार्च, २०२१ च्या सुमारास वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून केलेल्या आत्महत्या प्रकरणातील दोषींवर अद्यापपर्यंत कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी विभागीय चौकशीअंती आणि तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या अहवालानुसार क्षेत्रसंचालक, श्री.एम.श्रीनिवास रेड्डी यांना दोषी ठरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२२ मध्ये नेमलेल्या समितीने श्री.रेड्डी यांना दोषी ठरवून देखील विद्यमान प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांनी नव्याने स्वतंत्ररित्या अभिप्राय मागवून सदर प्रकरणाची नस्ती बंद केल्याने श्री.रेड्डी यांना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिनांक १५ मार्च, २०२४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील पुरावे नष्ट करण्यात येत असल्याची तक्रार कै.दिपाली चव्हाण यांच्या कुटुंबीयांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

श्रीमती दिपाली चव्हाण, तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी, हरिसाल यांनी केलेल्या आत्महत्या प्रकरणी पोलीस स्टेशन, धारणी जि.अमरावती येथे दिनांक २६.०३.२०२१ रोजी प्रथम खबर अहवाल (FIR) दाखल करण्यात आला आहे. शासनाने सदर प्रकरणी डॉ.प्रज्ञा सरवदे, भापोसे, अपर पोलीस महासंचालक यांची दिनांक ३१.०३.२०२१ च्या आदेशान्वये नियुक्ती करुन केलेल्या चौकशीच्या आधारे संबंधीत श्री.विनोद शिवकुमार व श्री.एम.एस.रेड्डी, या दोन भावसे अधिकाऱ्यांना शासनाने अनुक्रमे दिनांक २६.०३.२०२१ व दिनांक

३१.०३.२०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित केले असून श्री.विनोद शिवकुमार अद्यापी निलंबित आहेत. त्याचप्रमाणे उपरोक्त दोन्ही भावसे अधिकाऱ्यांविरुध्द प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक विभागीय चौकशीची कार्यवाही शासन स्तरावर सुरु करण्यात आली आहे.
(२) तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांनी तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण) यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने श्री.एम.एस.रेड्डी यांना काही अंशी दोषी ठरविले होते. सदर समितीचा अहवाल Assistant Registrar (LAW), National Human Rights Commission, New Delhi यांनी विचारणा केल्यानुसार मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, अमरावती यांनी परस्पर सादर केला आहे. शासन स्तरावर श्री.एम.श्रीनिवास रेड्डी यांचेविरुध्द सुरु करण्यात आलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला असून त्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सेनगाव (जि.परभणी) येथे रोजगार हमी योजनेची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत**

**(२०) * ८२३७९ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगाव (जि.परभणी) येथे रोजगार हमी योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून तेथील कामे देखील निकृष्ट दर्जाची होत असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच ग्रामसेवक ते गट विकास अधिकारी यांच्याकडून ही कामे मजूरांकडून करुन न घेता पूर्णतः यांत्रिक पद्धतीने करुन केवळ साईटवरील फोटो अपलोड करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात दलालांची मध्यस्ती होत असल्यामुळे योजनेचा पूर्ण लाभ मजूरांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन रोजगार हमी योजनेतील गैरप्रकार रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदिपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

सेनगाव तालुक्यात सन २०२३-२४ मध्ये एकूण ६५२० कामांना मंजूरी देण्यात आली आहे,त्यापैकी ८२८ कामे पूर्ण झाली, उर्वरित २२९२ कामे प्रगतीपथावर आहेत. संबंधित कामांकरिता गुणवत्ता व गुणनियंत्रण (Q.C) अहवाल प्राप्त करून संबंधित अभियंता यांच्याकडून प्रत्यक्ष भेटी देऊन कामांची पडताळणी करून कामे राबविण्यात येत आहेत. त्यामुळे कामे निकृष्ट दर्जाची झाल्याची आज रोजी पर्यंत कोणतीही तक्रार या कार्यालयास प्राप्त नाही.
(२) हे खरे नाही

केंद्र शासनाने दिनांक ०१ जानेवारी २०२३ पासून सर्व प्रकारच्या सार्वजनिक स्वरूपाच्या कामावरील प्रत्येक मजुराची उपस्थिती एन एम एम एस एफ वर नोंदविणी बंधनकारक केले आहे त्यामुळे कामांवरील सर्व मजुरांची हजेरी यांनी एमएमएस हे ॲप्लीकेशन मध्ये संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम रोजगार सेवकांनी प्रत्यक्ष कामावर जाऊन हजेरीपटावरील मजुरांची हजेरी ऑनलाइन नोंदविलेली आहे त्यावरून सदरील कामे मजुरांमार्फतच झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०२३-२४ मध्ये तालुका सेनगाव करिता मग्रारोहयो अंतर्गत कामावरील मजुरांची मजुरी रुपये २२ कोटी ८७ लक्ष संबंधित मजुरांच्या खात्यावर विहित कालावधीमध्ये अदावयी करण्यात आलेली आहे. योजनेच्या कामांमध्ये दलांची मध्यस्ती होत असल्याबाबत पंचायत समिती स्तरावर लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत .

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कोकणासह काही जिल्ह्यात वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२१) * ८००५१ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दादाराव केचे (आर्वी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोकण व विदर्भासह अनेक जिल्ह्यात विविध ठिकाणी रानटी हत्ती, बिबट्या, गवा रेडा, डुक्कर या वन्य प्राण्यांनी मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान करुन वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांत ४१० हून अधिक शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राजापूर परिसरात मुक्तपणे संचार करणाऱ्या बिबट्याने दहशत पसरवलेली असतानाच सध्या गवा रेड्यांचाही त्रास वाढून एका शेतकऱ्याचे ४० ते ५० काजूसह इतर फळझाडांचे नुकसान केल्याची घटना दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात तसेच दोडामार्ग व सावंतवाडी तालुक्यात (जि.सिंधुदूर्ग) हत्तींचा वावर वाढत असून तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सावंतवाडी वनविभाग कार्यालयासमोर आंदोलन केल्यानंतर यासंदर्भात शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देऊनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे वनप्राण्यांच्या हल्ल्यात जखमींनाही आर्थिक मदत करण्याचे धोरण असताना भामरागड तालुक्यातील कियर जंगलात राहणाऱ्या एका महिलेस रानटी हत्तीने दिनांक २५ एप्रिल, २०२४ रोजी जखमी केले असून त्या महिलेस वन विभागाने कोणतीही मदत केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच वारंवार प्रसारित होणाऱ्या माध्यमाद्वारे व प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी केलेल्या तक्रारींचा विचार करुन दौंड तालुक्यातील बिबट्या व तत्सम प्राणी आढळलेल्या परिसरात पिंजरे लावणे व टास्क फोर्सची तयार करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात वन्य प्राण्यांचे हल्ले तसेच या प्राण्यांकडून पिकांचे

सातत्याने नुकसान होत असल्याने रानटी हत्तीचा बंदोबस्त करण्याबाबत तसेच इतर वन्य प्राण्याकडून होणारे हल्ले रोखण्याबाबत तसेच वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यात सन २०२३-२४ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ६४ व्यक्ती मृत झाल्याच्या घटना व १०४४३६ पिक हानीची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.
(२) होय हे खरे आहे.

ता. राजापूर येथे बिबट या वन्यप्राण्याचा वावर असल्याचे आढळून आहे. तसेच माहे जानेवारी, २०२४ ते एप्रिल, २०२४ या कालावधीत वन्यप्राण्याकडून शेतपिक व फळझाडांचे नुकसान केल्याच्या ४ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित तरतुदीनुसार संबंधितास अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(३) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यामध्ये वन्यहत्तींचा वावर व उपद्रवामुळे शेतपिक व फळझाडांचे नुकसान होत असल्यामुळे त्यांचा बंदोबस्त करणे व नुकसान भरपाईमध्ये वाढ करणेसाठी मौजे करे, भेकुर्ली, बांबर्डे, पाळये, सोनावल, हेवाळे, घाटीवाडे, घोडगेवाडी येथील ग्रामस्थांनी दिनांक १०.०८.२०२३ रोजी उपवनसंरक्षक, सावंतवाडी यांचे कार्यालयासमोर जन-आंदोलन केले होते.

दिनांक ३०.०१.२०२४ रोजीच्या अधिसूचनेमध्ये फळझाडांकरीता व शेतपिकांच्या नुकसान भरपाईकरीता करण्यात आलेल्या वाढीचा समावेश करण्यात आला आहे.
(४) श्री. गोगंलु रामा तेलामी, रा. कियर, ता. भामरागड, जि. गडचिरोली यांचा दिनांक २४.०४.२०२४ रोजी हत्ती या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार रु.२५.०० लक्ष इतके अर्थसहाय्य मंजूर करुन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) हे खरे आहे.
(६) सावंतवाडी व कोल्हापूर वनविभागामध्ये मानव-वन्यहत्ती संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- कोल्हापूर व सावंतवाडी वन विभागातीन मानव-वन्यहत्ती संघर्ष कमी करण्यासाठी सन २०२३ ते सन २०२६ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता कृती आराखड्यास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.
- दोडामार्ग तालुक्यातील मौजे आयनोडे, घोडगेवाडी व केंद्रे बुद्रुक या ठिकाणी हत्ती कॅम्प उभारण्यात आले आहेत.
- वन अधिकारी / कर्मचारी, स्थानिक लोकांच्या सहभागाने हत्ती हाकारा गट तयार करण्यात आले असून त्यांच्यामार्फत वन्यहत्तींना मानवी वस्तीपासून त्यांचे नैसर्गिक अधिवासात परतावून लावण्यात येते.
- वन्यहत्ती मानवी वस्तीत येवू नये याकरीता वनक्षेत्रामध्ये जिथे शक्य आहे तेथे हत्ती प्रतिबंधक चर (खंदक) खोदण्यात येते.
- हत्तींच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी Night Mode Drone कॅमेराचा वापर करण्यात येतो.
- वन्यहत्तींना वनक्षेत्रातच खाद्य उपलब्ध व्हावे याकरीता वृक्ष लागवड करण्यात येते.
- गस्तीसाठी वाहन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक जिल्ह्यांत भूजल पातळी कमी होऊन निर्माण झालेली पाणीटंचाई**

**(२२) * ८०८५० श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तापमान वाढीमुळे भूजल पातळी कमी होऊन मोठ्या प्रमाणात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे पाण्याअभावी मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, दक्षिण व पश्चिम महाराष्ट्र येथे कमाल तापमान ४० डिग्री सेल्सियसहून अधिक वाढ झाल्याने पाण्याअभावी जवळजवळ २२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची भिषण परिस्थिती आली असल्याची माहिती ज्येष्ठ कृषी हवामान तज्ज्ञ डॉ.रामचंद्र साबळे यांनी दिनांक १० एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी नुकसान झालेल्या शेतपिकांचे वेळेत पंचनामे न होणे, पंचनामे सदोष होणे, एकाच मंडळाअंतर्गत करण्यात येणाऱ्या दोन ठिकाणच्या पंचनाम्यात तफावत असणे, केंद्र शासनाच्या निकषानुसार दुष्काळ किंवा दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहिर करताना पारदर्शकता नसणे, काही जिल्ह्यांना मदत देण्यात येणे तर काही जिल्हे मदतीपासून वंचित राहणे तसेच विंधन विहिरीबाबत येणाऱ्या अडचणी इत्यादी प्रकार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करुन शासनाने दुष्काळबाधित जिल्ह्यांना तातडीने मदत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अंशत: खरे आहे

(२) व (३) शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये १५ जिल्ह्यातील ४० तालुक्यात गंभीर/मध्यम स्वरुपाचा दुष्काळ घोषित करण्यात आला आहे.

(४) केंद्र शासनाने दुष्काळ व्यवस्थापन संहिता-२०१६ मध्ये राज्यात दुष्काळ जाहिर करण्यासाठी शास्त्रीय निकष व सुधारित कार्यपध्दती विहित केलेली आहे. राज्य शासनाने दुष्काळाचे मुल्यांकन करण्यासाठी महामदत (Maha-MADAT) ही संगणकीय प्रणाली विकसित केली असून या संगणीय प्रणालीव्दारे निर्देशांक परिगणित करण्यात येते.

(५) शासन निर्णय दिनांक २९.२.२०२४ अन्वये १५ जिल्ह्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांकरिता रक्कम रुपये २४४३.२३ कोटी एवढा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मंजूर केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पेरमिली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याला लाच स्वीकारताना पकडल्याबाबत**

**(२३) * ७९५४० श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेरमिली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील वनपरिक्षेत्रांतर्गत रस्त्यांच्या कामासाठी बेकायदेशीर उत्खनन करुन वापरलेल्या मुरुमाचे ट्रॅक्टर पकडून ७२ लाखांच्या दंडाची रक्कम कमी करुन ट्रॅक्टर सोडण्यासाठी दहा लाख रुपयांची मागणी करुन पाच लाख रुपये स्वीकारणाऱ्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक ६ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासकीय निवासस्थानी पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात वनक्षेत्र मोठ्या प्रमाणात असून वनउपज तस्करी तसेच वन क्षेत्रातील खनिज संपत्तीची लूट केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन सर्व संबंधितांवर फौजदारी व दंडात्मक स्वरुपाची कारवाई करणेबाबत तसेच अवैध उत्खनन थांबविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) गडचिरोली जिल्ह्यात आलापल्ली वनविभागाचे कार्यक्षेत्र अतिसंवेदनशील/नक्षलग्रस्त भागात मोडते. वनउपज तस्करी प्रकरणी गस्त करुन भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये संबंधितावर गुन्हे नोंदवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. या क्षेत्रात पक्क्या रत्यांचे जाळे कमी असल्याने जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग व इतर विभागामार्फत रस्त्यांची कामे केली जातात. सदर रस्त्याच्या कामासाठी लागणारे गौण खनीज रॉयल्टी क्षेत्रातील न वापरता जे कंत्राटदार रात्री अपरात्री कामे करुन वनक्षेत्रातील मुरुम, रेती व माती वापरुन रस्ते तयार करतात अशा कंत्राटदारांविरुध्द वनविभागाकडून वनकायद्यांतर्गत गुन्हा नोंदवून नियमानुसार वेळीच कार्यवाही केली जात आहे. तसेच लाच स्वीकारल्याप्रकरणी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यास निलंबित करण्यात आले असून त्याच्याविरुध्द फौजदारी कारवाई सुरू आहे.

वन उपजाची तस्करी, गौण खनिजांचे अवैध उत्खनन इ. बाबींना आळा घालण्यासाठी संबंधित वनक्षेत्रात गस्तीचे प्रमाण वाढविणे, वन विभागाच्या परवानगीशिवाय वनक्षेत्रात कोणतेही काम सुरू करता येणार नाही, असे संबंधिताना सूचित करणे, अवैध उत्खनन केल्यास संबंधिताविरुध्द वनगुन्हा नोंदवून दंडात्मक कार्यवाही करणे, अवैध उत्खनन होत असल्यास त्याबाबत तातडीने वन विभागास माहिती पुरविण्याबाबत स्थानिक ग्रामस्थ/रहिवाशी यांच्यात जनजागृती करणे इ. उपाययोजना करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोकण किनार पट्टीतील मच्छीमार बांधवांच्या अनेक मच्छीमार सोसायट्यांना डिझेल परताव्याची रक्कम मिळाली नसल्याबाबत**

**(२४) * ७९८६८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनार पट्टीतील मच्छीमार बांधवांच्या अनेक सोसायट्यांच्या डिझेल परताव्याची सुमारे ७० ते ८० कोटी रक्कम अद्याप न मिळाल्याने त्यांचा व्यवसाय धोक्यात आल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान

निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मच्छीमार संस्थांनी डिझेल परताव्याची प्रकरणे सहाय्यक मत्स्यव्यवसाय अधिकारी यांच्याकडे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्यामुळे त्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा त्वरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता नियमितपणे डिझेल परतावा अदा करण्याकरीता रु.१५०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-वडोदरा एक्सप्रेस रस्त्याच्या कामात बाधितांना घरांचा व जमिनींचा मोबदला मिळाला नसल्याबाबत**

**(२५) * ७९४३२ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गामुळे बाधित झालेल्या लोकांना अद्यापही मोबदला देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या कामामध्ये काही प्रकल्पबाधितांना घरांचा व जमिनींचा मोबदला मिळाला नसतानाही घरे रिकामी करण्याची कार्यवाही दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही ठिकाणी शेतकरी व जमीनमालक यांच्याकडून होणारा विरोध शमविण्यासाठी त्यांना नियमबाह्य मोबदला दिल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, उक्त महामार्गासाठी पालघर तालुक्यातील २७ गावांमधून ३९२.७७३८ हेक्टर-आर खाजगी जागेचे संपादन झाले असून यामध्ये पालघर तालुक्यात किराट येथे अधिग्रहित क्षेत्राबाहेर असणाऱ्या घरमालकांना कोट्यावधीचा मोबदला देण्यात आला व जमीन संपादित करताना बोगस अहवाल तयार करुन गैरव्यवहार केल्याची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय.
(५) असल्यास, त्यानुषंगाने पालघर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने चौकशी करुन अहवाल सादर केला आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पबाधितांना त्यांच्या घरांचा व जमिनींचा योग्य तो मोबदला देण्यासंदर्भात व याप्रकरणी दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) ते (६) मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गासाठी पालघर तालुक्यातील २७ गावातील ३९२.७७३८ एवढे क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये संपादित करण्यात आले आहे. भूसंपादित जमिनीच्या मोबदल्यापोटी भूधारकांना ९५.२% रक्कम (भूधारकांना + न्यायालयात जमा) वितरीत

करण्यात आली आहे. भूधारकांना मोबदला अदा करुन, ज्या प्रकरणात वाद आहे अशा प्रकरणी न्यायालयात मोबदला जमा करुन, त्यांच्या जमिनीचा व घरांचा ताबा घेण्यात आला आहे.

दिनांक ०८.०५.२०२३ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीने जिल्हाधिकारी, पालघर यांना अहवाल सादर केला आहे. भूसंपादनाच्या सिमांकना बाहेरील ०२ बांधकामांना मोबदला अदा केल्याने तत्कालीन सक्षम अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांना नोटीस देऊन त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई सुरु आहे. तसेच, सदर अहवाल विचारात घेऊन, भूसंपादित होत नसलेल्या बांधकामास अदा केलेली मोबदला रक्कम वसुल करण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यात अनेक ठिकाणी शेती वापरासाठीच्या युरिया खताचा होत असलेला काळाबाजार**

**(२६) * ७९४१९ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात युरिया खताचा काळाबाजार होत असून अनेक ठिकाणी शेती वापरासाठी असलेला युरिया इंडस्ट्रीज वापरासाठीच्या बॅगमध्ये भरुन जादा दराने विक्री करण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कडेगाव (जि.सांगली) येथील एका गोदामावर कृषी विभाग पथकाने धाड टाकली असता इंडस्ट्रीज वापराच्या बॅगेमध्ये भरलेला ३८ लक्ष रुपयांचा कृषी वापराचा युरिया दिनांक २३ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास जप्त करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे मौ.आटके कराड (जि.सातारा) येथे युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करुन जास्त दराने विक्री केल्याचा प्रकार माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन युरियाच्या काळाबाजारावर आळा घालणेबाबत तसेच यामध्ये दोषी असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे. सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुका येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील गोदामात अनधिकृत युरिया खतांचा साठा आढळून आला आहे. प्रत्यक्ष तपासणीअंती ३१.८५ लक्ष मुल्याचा युरिया जप्त करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यामध्ये सांगली जिल्ह्यातील कडेगाव एमआयडीसी मधील प्लॉट नं.४७ मध्ये असणाऱ्या सुजीत इंडस्ट्रीजच्या पश्चिमेला व प्लॉट नं.३७ दक्षिणेला मेन रोडच्या पूर्वेला असणाऱ्या प्लॉट नं. ए-३८ पत्र्याच्या शेडमध्ये शेती वापरासाठी असलेला अनुदानित युरियाच्या गोण्यामध्ये ६७.४५५ मे. टन तसेच औद्योगिक वापरासाठी छापलेल्या गोण्यामध्ये ७९.६० मे. टन अनधिकृत युरिया साठा आढळून आला. सदरचा युरिया जप्त करुन युरिया खतांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार सदर सर्व युरिया खत हे शेती वापरासाठी अनुदानित खत असल्याचे स्पष्ट झाले आहे. उक्त गोदामात पुरवणी जबाबानुसार कृषि वापरासाठीच्या युरियाच्या १४९९ बॅगा आढळून आल्या आहेत, सदर बॅगांचे एकूण मुल्य रु.३,९९,४८३.५०/- इतके होते. तसेच, गोदामामध्ये टेक्नीकल ग्रेड युरियाच्या ५० किलो वजनाच्या एकूण १५९२ बॅगा ट्रकमध्ये भरुन

वाहतूकीसाठी तयार असल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी पोलिस ठाणे येथे एफआयआर क्रमांक ००६७/२४ दिनांक २३/०३/२०२४ रोजी गुन्हा नोंदविला आहे. तसेच एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली असून कडेगाव पोलीस पुढील तपास करीत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,